<u>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३१२/२०२२**</u>

<u>**निशाणी ५१ कडे आदेश**</u>

<u>**(CNR No. MHRT 080006392022)**</u>

प्रस्तूत अर्जाद्वारे पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे देवरुख यांनी प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल विल्हेवाटीत करण्याबाबत आदेश करण्यासंबंधी विनंती केली आहे.

**०२.** त्यांचे म्हणणे असे की, महाराष्ट्र जुगार प्रतीबंध अधिनियम चे कलम ४ व ५ अन्वये आरोपींनी गुन्हा केले बाबत आरोप आहेत. सदर प्रकरणी खालील मुद्देमाल जप्त आहे –

**अ)** लाकडी षटकोनी आकाराचा रक्कम रुपये १०००/– किंमतीचा जुना वापरता एक टेबल.

**ब)** प्लॅस्टीकचा चॉकलेटी रंगाचा एक टेबल, सफेद रंगाच्या प्लॅस्टीकच्या ०५ खुर्च्या, काळया रंगाच्या बीग बॉक्स कंपनीच्या ०६ खुर्च्या, मरुन रंगाचे प्लॅस्टीकचे जुने वापरते ०३ लहान स्टूल,

**०३.** वरील जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यात जमा आहे. मुद्देमाल ठेवण्यास जागा अपूरी आहे. त्यामुळे मिळून आलेला वरील मुद्देमाल विल्हेवाटीत करण्यासाठी आदेश व्हावेत अशी विनंती प्रस्तुततच्या अर्जान्वये पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे देवरुख यांनी केली आहे.

**०४.** आरोपीने सदर प्रकरणी जप्त मुद्देमालाशी त्यांचा काही संबंध नाही, त्याबाबत योग्य तो आदेश पारीत करावा, असे म्हणणे मांडले आहे.

**०५.** या प्रकरणी विद्वान सहा. सरकारी विधीज्ञा यांनी नि. ५५ कडे म्हणणे देवून अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०६.** प्रस्तूत प्रकरणी दोषारोपपत्र दाखल झाले आहे. आरोपीचे प्रतिकथन नोंदवून घेतले आहे. प्रस्तूत प्रकरण संपरीक्षेकरिता प्रलंबित आहे. संपरीक्षा पूर्ण होवून प्रकरण निकाली निघण्यास काही अवधी लागणार आहे. वरील मुद्देमाल हा पोलीस ठाण्यात तसाच ठेवून काही साध्य होणार नाही. याबाबत पंचनामा हा संपरीक्षेच्यावेळी उपयुक्त पुरावा असेल. सबब, नमूद कारणे व वरील सर्व बाबी पाहता, कलम ४५१ फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अन्वये मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो–

**आदेश**

१. अर्ज मंजूर करणेत आला.

२. वरील नमूद जप्त मुद्देमाल हा जाहीर लिलावाने विक्री करुन त्यातून आलेली रक्कम राज्य शासनाकडे जमा करावी.

३. वरीलप्रमाणे कार्यवाहीबाबत सविस्तर अहवाल या न्यायालयात सादर करण्यात यावा.

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.04.03 16:30:02 +0530

दिनांक ०३/०४/२०२४

**(ब. द. तारे)**

न्यायदंडाधिकारी वर्ग–१, देवरुख

**- : <u>C E R T I F I C A T E</u> : -**

Judgment/order in ( Order below Exh. 51 in S.C.C. No. 312/2022)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :- | 03/04/2024 |
| Order signed by PO. on | :- | 03/04/2024 |
| Order uploaded on | :- | 03/04/2024 |